राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमाकरीता जिल्हास्तरावर "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती" व प्रादेशिक स्तरावर "विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती" गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(११९/१०)/व्यशि-५

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २१ मे, २०११.

पहा :
१. पंतप्रधान कार्यालय, नवी दिल्ली यांची क्रमांक. ३६०/३१/सी/८/०८-इएस,II, दि.१ जुलै, २००८ ची अधिसूचना.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र.कौविका-२०१०/(३/२०१०)/व्यशि-५, दिनांक १९ मे २०१०.
३. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.संकिर्ण-१००७/५४६/१८(र. व का.), दिनांक ८ सप्टेंबर २०१०.
४. रोजगार व स्वयंरोजगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक इएसई-२०११/प्र.क्र.२०/ प्रशा-२, दिनांक ०५ मार्च २०११.

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकाससंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Ministers National Council on Skill Development) स्थापना संदर्भाधिन क्र.१ च्या अधिसूचनेद्वारे करण्यांत आली आहे. मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेली राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद ही प्रामुख्याने कौशल्य विकास संदर्भातील महत्त्वाची राष्ट्रीय धोरणे ठरविणे, वित्तीय व प्रशासकीय अंमलबजावणी संदर्भातील निर्णय घेणे, कौशल्य विकास संदर्भातील कार्यवाही बाबतच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे, आवश्यकतेनुसार याबाबतच्या धोरणामध्ये बदल / सुधारणा सुचविणे, त्याचप्रमाणे कौशल्य विकासाच्या दृष्टीने शासकीय व खाजगी क्षेत्रामध्ये समन्वय साधणे या उद्देशाने गठीत करण्यांत आली आहे. सदरहू कौशल्य विकास परिषदेने ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

२. केंद्र शासनाने उपरोक्तप्रमाणे गठीत केलेल्या राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेच्या धर्तीवर राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना देण्याच्या दृष्टीने संदर्भ क्रमांक २ येथील शासन निर्णयानुसार मा.मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय शिखर परिषदेची व मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कार्यकारी समितीची स्थापना करण्यांत आलेली आहे.

३. सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे कामकाज त्यांच्या क्षेत्रीय नियंत्रणाच्या कामकाजासह सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सोपविण्यांत आले आहे.

४. रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णयानुसार "आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार" यांचे पदनाम "आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास" असे सुधारीत

करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय कौशल्य विकास अभियानाच्या समन्वयाचे कामकाज सदरहू आयुक्ताकडे सोपविण्यांत आले आहे.

४. राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम या योजनेची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कौशल्य विकास कार्यकारी समिती व प्रादेशिक स्तरावर विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-** उपरोक्त पार्श्वभूमीवर राज्यात राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर **"जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती"** व विभागीयस्तरावर **"विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती"** स्थापन करण्यास खालीलप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.

**अः- जिल्हास्तरीय "जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समिती"**

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी. | **अध्यक्ष** |
| २) | मुख्याधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर पालिका / नगर पालिका / जिल्हा परिषद. | **सदस्य** |
| ३) | जिल्हा शिक्षण अधिकारी (माध्यमिक). | सदस्य |
| ४) | जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी. | सदस्य |
| ५) | प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (जिल्हास्तरीय). | सदस्य |
| ६) | जिल्हा कृषि, पशु संवर्धन,मत्स्य संवर्धन अधिकारी. | सदस्य |
| ७) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी. | सदस्य |
| ८) | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी. | सदस्य |
| ९) | प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा. | सदस्य |
| १०) | जिल्हा आरोग्य अधिकारी. | सदस्य |
| ११) | महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र. | सदस्य |
| १२) | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक जिल्हा विकास प्रकल्प आदिवासी विभाग. | सदस्य |
| १३) | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. | सदस्य |
| १४) | प्रतिनिधी Confederation of Indian Industry (CII). | सदस्य |
| १५) | जिल्ह्यामधील किमान दोन प्रख्यात स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी. | सदस्य |
| १६) | जिल्ह्यामधील तीन औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी (उद्योग संघटना, बिल्डर ॲसोसिएशन, इ.). | सदस्य |
| १७) | सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार. | **सदस्य सचिव** |

**जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची कार्यकक्षाः-**

१. राज्य कौशल्य विकास कार्यक्रमाची जिल्हास्तरावर अंमलबजावणी करणे व विविध माध्यमांमार्फत जिल्हास्तरावर प्रसिध्दी देणे.

२. राज्यस्तरावरुन ठरवून दिलेले कुशल मनुष्यबळाचे उद्दिष्ट गाठण्याकरीता जिल्हानिहाय कौशल्य विकास आराखडा (Sector Skill Development Plan) व अंमलबजावणी करीता उपाय योजना तयार करणे.

३. राज्य शासनाकडून कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत वेळोवेळी प्राप्त होणा-या मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे व आढावा घेणे.

४. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी अंदाजित केलेल्या खर्चासाठी निधी उपलब्धतेचे स्त्रोत निश्चित करणे, जसे (१) जिल्हा योजना, (२) खाजगी उद्योग समूह / औद्योगिक संघटना (३) NGOs.

५. प्रशिक्षकांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे जिल्हास्तरावर नियोजन करणे.

६. कुशल मनुष्यबळास रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सहाय्य, मार्गदर्शन, नियंत्रण करणे. इत्यादी. त्याअनुषंगाने उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार / स्वयंरोजगार मिळवून देण्याकरीता खाजगी आस्थापनांच्या सहकार्याने भरती / स्वयंरोजगार मेळावे आयोजित करणे. तसेच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याकरीता उद्योग समूहांशी समन्वय साधणे.

७. विभागीय कौशल्य विकास समितीस आपल्या जिल्ह्याचा त्रैमासिक प्रगति अहवाल व आराखडा सादर करणे.

कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या जिल्हा कौशल्य विकास कार्यकारी समितीची एक महिन्यातून किमान एक बैठक आयोजित करणे **आवश्यक आहे.**

**ब:- विभागीयस्तरीय "विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समिती"**

| | | |
|---|---|---|
| १) | विभागीय आयुक्त. | **अध्यक्ष** |
| २) | विभागातील सर्व जिल्हाधिकारी. | सदस्य |
| ३) | संबंधित महानगर पालिका आयुक्त. | सदस्य |
| ४) | सह/उप संचालक, शिक्षण विभाग. | सदस्य |
| ५) | सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण. | सदस्य |
| ६) | सह संचालक, उच्च शिक्षण. | सदस्य |
| ७) | सह संचालक, तंत्र शिक्षण. | सदस्य |
| ८) | विभागीय सह संचालक, उद्योग विभाग. | सदस्य |
| ९) | विभागीय कृषि सह संचालक, कृषि विभाग. | सदस्य |
| १०) | विभागीय समाज कल्याण अधिकारी. | सदस्य |
| ११) | उप आयुक्त, महिला व बाल कल्याण. | सदस्य |
| १२) | सह / उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग. | सदस्य |
| १३) | विभागीय आयुक्त, ग्राम विकास विभाग. | सदस्य |
| १४) | अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग. | सदस्य |
| १५) | प्रादेशिक सह आयुक्त, पशु संवर्धन. | सदस्य |
| १६) | उप आयुक्त, मत्स्य संवर्धन. | सदस्य |
| १७) | प्रतिनिधी, Confederation of Indian Industry (CII). | सदस्य |
| १८) | विभागीय स्तरावरील २ औद्यौगिक संघटनांचे प्रतिनिधी . | सदस्य |
| १९) | संबंधित प्रादेशिक स्तरावरील नामांकित उद्योजक-२. | सदस्य |
| २०) | उप संचालक, रोजगार व स्वयंरोजगार. | **सदस्य सचिव** |

**विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समितीची कार्यकक्षा:-**

१) जिल्हानिहाय कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या कार्याचा वेळोवेळी आढावा घेणे.

२) विभागातील कुशल मनुष्यबळाची मागणी लक्षात घेता सेक्टर निहाय प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीस जिल्हा कौशल्य कार्यकारी समितीस मार्गदर्शन करणे.

३) मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य कौशल्य विकास कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये विभागीय कौशल्य विकास समितीचा अहवाल सादर करणे.

४) विभागीय कौशल्य समितीने त्यांच्या विभागाचा त्रैमासिक प्रगति अहवाल रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडे पाठविणे आवश्यक राहील.

राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यांत आलेल्या विभागीय कौशल्य विकास कार्यकारी समितीची त्रैमासिक बैठक आयोजित करणे आवश्यक राहील.

हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर www.maharashtra.gov.in यावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय संकेतांक क्र. २०११०५१०१७३३०१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सीमा ढमढेरे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्री / मा.उप मुख्यमंत्री व सर्व संबंधित मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिवांचे कार्यालय.
मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव.
सर्व संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
सर्व आयुक्त, महानगर पालिका [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत].
सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत].
सर्व विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगर पालिका / नगर परिषद / जिल्हा परिषद [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, कोकण भवन, नवी मुंबई.
उपरोक्त समितीमधील सर्व शासकीय सदस्य.
उपरोक्त समितीमधील सर्व अशासकीय सदस्य.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक/उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत].
महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
कार्यासन अधिकारी (साशि-१), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
कार्यासन अधिकारी, व्यशि-१,२,३,४.
निवड नस्ती/व्यशि-५.